जा.क्र./मनपा/अआ/स्वीस/ ५६/२०२०
दिनांक :-१४/०२/२०२०

प्रति,
मा.आयुक्त
नाशिक महानगरपालिका.

विषय :- अे.एन.एम.पदाच्या सदोष भरती प्रक्रियेबाबत..
संदर्भ :- मा.सौ.सुषमा रवि पगारे, सदस्य, स्थायी समिती यांचे पत्र दि. 4/2/2020

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रान्वये सन्माननीय सदस्य यांनी ए.एन.एम. पदाच्या भरती प्रक्रिये मध्ये त्रुटी व सदोष असल्याने सदर भरती प्रक्रियेस त्वरीत स्थगिती देणेबाबत कळविले आहे. त्या अनुशंगाने खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

ए.एन.एम. पदा करिता शैक्षणिक गुणांकरिता शेवटच्या वर्षाचे गुणपत्रिके नुसार 80 टक्क्या मध्ये परावर्तीत गुण , दोन वर्ष अनुभव असल्यास 3 गुण, पुढील प्रत्येक वर्षाला 1 गुण असे जास्तीत जास्त 5 गुण, अतिरिक्त शैक्षणिक अर्हता यास जास्तीत जास्त 5 गुण, मुलाखत -10 गुण असे एकुण 100 गुण असे निकष ठरविणेत आले होते. ए.एन.एम. पदाची मुलाखत दि. 21/11 /2019 रोजी घेण्यात आली होती. त्यासाठी 10 गुण होते. मुलाखती मध्ये श्रीमती अहिरे यांना दिलेल्या उत्तराप्रमाणे सर्व समिती सदस्य यांनी 4.25 इतके गुण देण्यात आले आहे. त्या अनुशंगाने पहिले पाच उमेदवारांचे तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | तपशिल | श्रीमती लता घोडके | श्रीमती अश्विनी कानघुले | श्रीमती ज्योती भोसले | श्रीमती दुर्गा उघडे | श्रीमती गिता आहिरे |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ए.एन.एम. शेवटच्या वर्षाची टक्केवारी | 89.50 | 82.71 | 88.33 | 86.17 | 83.71 |
| 2 | शैक्षणिक पात्रतेत परावर्तीत 80 पैकी गुण | 71.60 | 66.17 | 70.67 | 68.93 | 66.97 |
| 3 | अतिरिक्त शैक्षणिक अर्हता व अनुभव 10 पैकी गुण | 0 | 5 | 0 | 0 | 5 |
| **तोंडी मुलाखतीचे गुण** | | | | | | |
| 3 | मा.अतिरिक्त आयुक्त (सेवा) | 9 | 9 | 8 | 9.5 | 4 |
| 4 | मा.उप.आयुक्त (प्र) | 8 | 7 | 9 | 9 | 4 |
| 5 | मा.वैद्यकिय आरोग्य अधिकारी | 7 | 7 | 8 | 9 | 6 |
| 6 | मा.सहा.वैद्यकिय आरोग्य अधिकारी | 6 | 7 | 5 | 8 | 3 |
| | **एकुण** | 30 | 30 | 30 | 35.5 | 17 |
| 7 | तोंडी मुलाखतीचे एकुण 10 पैकी गुण | 7.5 | 7.5 | 7.5 | 8.88 | 4.25 |
| | शैक्षणिक पात्रतेत परावर्तीत 80 पैकी गुण | 71.60 | 66.17 | 70.67 | 68.93 | 66.97 |
| | अतिरिक्त शैक्षणिक अर्हता व अनुभव 10 पैकी गुण | 0 | 5 | 0 | 0 | 5 |
| | **एकुण टक्केवारी** | 79.10 | 78.67 | 78.17 | 77.81 | 76.22 |

राष्ट्रीय आरोग्य अभियानच्या मानांकनाप्रमाणे पात्र उमेदवारांची मुलाखत घेण्यात आली. मुलाखतीमध्ये उमेदवारांना त्यांच्या कामाच्या विषयी विविध प्रश्न विचारण्यात येऊन उमेदवाराची उपचाराची क्षमता, कामा विषयाचे ज्ञान तसेच निर्णयक्षमता यावरून मुलाखतीचे गुण देण्यात आलेले आहेत. मुलाखत घेताना चार परीक्षक यांनी त्यांचे वैयक्तिक गुण दिलेले आहेत. या चार जणांच्या गुणांचा मध्य काढून उमेदवाराचे तोंडी परीक्षेचे गुण देण्यात आलेले आहेत. यावरून स्पष्ट होते की कोण्या एकाच्या गुणांनुसार उमेदवार निवडता येत नाही तर एकंदरीत उमेदवाराच्या मुलाखत पात्रते नुसारच गुण दिले जातात व त्याप्रमाणे निवड उमेदवारांची अंतिम यादी तयार होते. मुलाखत समितीच्या गुणांवर प्रश्न उपस्थित करणे उचित नाही असे मत आहे.

सबब सदरची भरती प्रक्रिया सदोष नसल्याने स्थगीत करणेत येऊ नये असे मत आहे.

(बी.जे.सोनकांबळे)
अतिरिक्त आयुक्त (सेवा)
नाशिक महानगरपालिका,नाशिक